# Department Of Marathi

## Best Practice

**1.Title of the Practice (शीर्षक) :-** 'मायबोली वाचन कट्टा'

2. **Objectives of the Practice ( उद्देश)**

i) विद्यार्थी - प्राध्यापक वाचन कट्टा सुरु करून वि द्यार्थी- प्राध्यापक यांच्यात वाचनाची आवड निर्माण निर्माण करणे.

ii) वाचन संस्कृती टिकवणे व रुजवणे.

iii) सर्जनशक्तीचा विकास करणे.

iv) भाषिक कौशल्याचा विकास करणे.

**3.The Context (पार्श्वभूमी):-**

माणूस सुसंस्कारी व्हावा यासाठी वाचनाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा वाचन संस्कृतीवर मोठा परिणाम झाला असून वाचन संस्कृती बुडत चालली असल्याची चर्चा आज समाजात सर्वत्र सुरू आहे.

**4.The Practice प्रत्यक्ष कृती/उपक्रम/कार्य :-**

वाचन प्रेरणा दिन, काव्यनिर्मिती प्रक्रिया आणि कविसंमेलन, निबंध – वक्तृत्व स्पर्धा, वेबिनार, कार्यशाळा, पोस्टर प्रदर्शनात सहभाग .

**अहवाल-**

व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन या भाषिक कौशल्याचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच वाचनाचे महत्त्व व गरज लक्षात घेऊन हा उपक्रम मराठी विभागामध्ये सुरू करण्यात आला आहे. आपण पूर्वीपासूनच आपला सांस्कृतिक वारसा लिखित साहित्याच्या वाचनातून जतन करत आलो आहोत. जगात सर्वात श्रेष्ठ संस्कृती म्हणजे वाचन संस्कृती होय. वाचन संस्कृतीमुळे माणसाच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो यामुळे माणसाचे मन , मेंदू कार्यक्षम होत असतो . परिणामी आपली वैचारिक पातळी अधिक विकसित होत असते . एकूणच विद्यार्थ्यांच्या मध्ये विविध मूल्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. बदलत्या आधुनिक जीवनशैली मध्ये विद्यार्थी पुस्तकापासून दुरावलेला दिसत आहे.

त्यामुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची पुस्तकांशी मैत्री झाली पाहिजे आणि विद्यार्थी अधिक ज्ञान समृद्ध झाला पाहिजे या हेतूने हा वाचन कट्टा सुरू करण्यात आला आहे.

या वाचन कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यां मध्ये श्रवण, भाषण, वाचन, लेखन या चारही भाषिक कौशल्यांचा विकास घडवण्याचा प्रयत्न केला जातो . यासाठी विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करून त्यांना पुस्तके उपलब्ध करून दिली जातात . वाचनाची आवड त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी यासाठी त्यांना मार्गदर्शन केले जाते , मराठी साहित्याची ओळख करून दिली जाते. विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांना पुस्तक देऊन त्यांच्याकडून वाचन करून घेउन या पुस्तकावर विद्यार्थ्यांना आपली मते व्यक्त करायला सांगितले जाते . त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती कौशल्याचाही विकास या माध्यमातून होतो . वाचनातूनच लेखन व संभाषण या कौशल्यांचा देखील विकास होतो. विद्यार्थी आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचे कथन करतात. समृद्ध अनुभव हीच खरी लेखनाची पहिली पायरी आहे, यासाठीही विद्यार्थ्यांमध्ये जागृती ही निर्माण केली जाते.

यासाठी या वाचन कट्ट्या अंतर्गत निबंध स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा , हस्ताक्षर स्पर्धा , गटचर्चा, ग्रंथालय भेट, काव्यवाचन- लेखन कार्यशाळा घेतल्या जातात. सर्जनशील लेखन कसे करावे याचेही मार्गदर्शन केले जाते . यामध्ये विद्यार्थी सहभागी होतात त्या मुळे त्यांची सर्जनशीलता देखील वाढीस लागते . या वाचना मुळे विद्यार्थी सामाजिक, शैक्षणिक , सांस्कृतिक, पर्यावरण अशा विविध विषयांवर चर्चा करतात. प्रतिक्रिया व्यक्त करतात.
या सर्व वाचन कौशल्याच्या विकासातून कविता लेखन करणे ललित लेख लिहिणे वैचारिक लेख लिहिणे यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते विद्यार्थी देखील या माध्यमातून विविध प्रकारचे साहित्याचे लेखन करताना दिसतात त्यामधून त्यांचे अभिव्यक्ती कौशल्य लेखन कौशल्य देखील विकसित झालेले दिसते.

काच वेळी अनेक विद्यार्थ्यांच्या पर्यंत पोहोचण्यासाठी तसेच विद्यार्थ्यां पर्यंत विविध वाचनीय सदरे पोहोचवण्यासाठी **‘मायबोली वाचन कट्टा’** या नावाने व्हाट्सअप ग्रुप आयोजित निर्माण केला आहे . हा ग्रुप नेहमी कार्यरत असतो. या समूहाच्या माध्यमातून विविध वाचनीय लेख, त्याची कात्रणे , विविध वाचनीय कविता , ललित लेख , विविध वाचन -लेखन विषयक उपक्रम याविषयी माहिती दिली जाते . यामधून विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याला चालना देण्याचे काम सतत होत असते.

## 1.Evidence of Success (यशस्वी असल्याचे पुरावे)-

विद्यार्थ्यमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. विद्यार्थी विविध निबंध - वक्तृत्व स्पर्धामध्ये सहभागी होऊ लागले.

**वाचन कट्टा अंतर्गत**




**वाचन कट्टा उपक्रमांतर्गत कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी चर्चा करताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अशोक तवर**




**वाचन कट्टा उपक्रमांतर्गत कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी चर्चा करताना प्रा. डॉ. महेश गायकवाड**




**वाचन कट्टा उपक्रमांतर्गत कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी चर्चा करताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अशोक तवर**




**वाचन कट्टा उपक्रमांतर्गत कार्यक्रमात चर्चा करताना विद्यार्थी**




**वाचन कट्टा उपक्रमांतर्गत कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. विजया पवार**




**संवाद लेखन विषयी प्रात्यक्षिक सदर करताना विद्यार्थी**

## मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण

**दि. २७ फेब्रुवारी २०२१**




**मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना मा. कवी वसंत शिंदे**




**निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना मा.प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ**

1.Problems Encountered and Resources Required- ( समस्या कोणत्या आल्या व त्यावर उपाययोजना काय शोधल्या/ किंवाकोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.)

**समस्या –**

१)विद्यार्थ्यांना वाचनाची आवड करून देणे, वाचनाचे महत्त्व पटवून देणे अवघड काम होते.

२)मोबाईल मध्ये हरवलेले हे विद्यार्थी मुळात वाचनाविषयी उदासिन असलेले दिसले.

**उपाययोजना –**

१) विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले. त्यांना महत्त्व पटवून दिले.

२) विद्यार्थ्यांना विविध पुस्तके, लेखक, साहित्य प्रकार यांच्याविषयी त्यांना माहिती देऊन त्यांच्या मध्ये जिज्ञासा निर्माण केली.

3) विविध स्पर्धा, कार्यशाळा आयोजित करून त्यांच्यामधील कौशल्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला.

४) विद्यार्थ्यांमधील संभाषण कौशल्याचा विकास घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांशी चर्चा करणे, त्यांना आपले अनुभव सांगणे, त्यांना स्वत:चे अनुभव सांगण्यासाठी प्रेरणा देणे असे प्रयत्न केले.

●●●